Annexure XVI(3),(Vide Article-16.02.04)

प्र. मु. व. सं. म. राज्य
नागपूर-४४० ००६.
16 MAY 2007
आवक क्रमांक....506....
कक्ष क्रमांक....9.... स्वाक्षरी

**भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन/पुनर्विलोकन/स्विकृती कोणी करावी, याबाबत मार्गदर्शक सूचना.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र. एसीआर-१००१/प्र.क्र. ११४/फ-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० एप्रिल , २००७

संदर्भ:- १) शासन परिपत्रक,म. व व.वि. क्र. एसीआर-१००१/प्र.क्र.११४/ फ-७, दि. २३/६/०५

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा., नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-९ / सीसी/भावसे/८१/भाग-१/३७१/२००५, दि. २२/७/२००५.व पत्र क्र.कक्ष-९ / सीसी/भावसे/८१/भाग-२/२४५/२००६-०७, दि. २६/७/२००६0 व कक्ष-९/ सीसी/ गो.अ. /प्र.क्र. ६४ /७९०,/०६-०७, दि.५/३/२००७.

३)व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित,नागपूर यांचे पत्र क्र.एमडी/पीए/६२०५ दि.१०/१०/२००६

**शासन परिपत्रक:-**

श्री. टी. एन. गोदावर्मन, थिरुमुलकपड यांनी केंद्र शासन व इतर यांचेविरुध्द सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेली रिट याचिका क्र. २०२/१९९५ मधील आय.ए. क्र. ४२४, मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दि. २२/९/२००० च्या निर्देशानुसार भारतीय वन सेवतील महाराष्ट्र संवर्गातील अधिका-यांचे गोपनीय अभिलेख कोणी प्रतिवेदीत / पुनर्विलोकीत / स्विकृत करावेत याबाबतच्या सूचना शासन परिपत्रक,म. व व.वि. क्र. एसीआर-१००१/प्र.क्र. ११४/फ-७, दि. २३/६/०५ अन्वये देण्यात आल्या आहेत. परंतू काही पदांच्या श्रेणीवाढीमुळे अधिका-यांच्या गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन /पुनर्विलोकन / स्विकृती कोणी करावी याबाबत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी केलेल्या सुचनांचा विचार करुन आणखी असे निर्देश देण्यात येत आहेत की,

(१) भावसे संवर्गातील कनिष्ठ श्रेणीत कार्यरत असलेल्या अधिका-यांचे गोपनीय अहवाल ते ज्या वन विभागात कार्यरत असतील त्या विभागाच्या उप वनसंरक्षकांनी प्रतिवेदीत करावेत आणि संबंधित प्रतिवेदन अधिका-यांच्या नियंत्रण अधिका-यांनी ते गोपनीय अहवाल पुनर्विलोकीत करावेत. पुनर्विलोकन अधिका-यांच्या नियंत्रण अधिका-याने सदर गोपनीय अहवाल स्विकृत करावेत. तसेच परिविक्षाधीन भा.व.से. अधिका-यांचे गोपनीय अहवाल त्यांच्या नियंत्रक अधिका-यांनी प्रतिवेदीत करावेत. प्रतिवेदन अधिका-यांच्या नियंत्रक अधिका-यांनी ते पुनर्विलोकीत करावेत व पुनर्विलोकन अधिका-यांच्या नियंत्रक अधिका-यांनी स्विकृत करावेत.

(२) उप वनसंरक्षक दर्जाच्या स्तरावरील अधिका-यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करण्यासाठी सर्वसाधारणपणे प्रतिवेदन अधिकारी वनसंरक्षक राहतील. परंतू जेथे जेथे उप वनसंरक्षकांचे निकटतम नियंत्रण अधिकारी मुख्य वनसंरक्षक / अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक वा प्रधान मुख्य वनसंरक्षक स्तरावरील अधिकारी असतील तेव्हा त्या-त्या स्तवरावरील नियंत्रक अधिकारी त्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करतील या अनुषंगाने त्या प्रतिवेदन अधिका-यांचे निकटतम वरिष्ठ अधिकारी सदर प्रतिवेदीत गोपनीय अहवाल पुनर्विलोकीत करतील व सदर पुनर्विलोकन अधिका-यांचे निकटतम वरिष्ठ अधिकारी स्विकृती अधिकारी असतील.

३) वनसंरक्षक दर्जाच्या स्तरावरील अधिका-यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करण्यासाठी सर्वसाधारणपणे प्रतिवेदन अधिकारी मुख्य वनसंरक्षक राहतील. परंतू जेथे जेथे वनसंरक्षकांचे निकटतम नियंत्रण अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक वा प्रधान मुख्य वनसंरक्षक स्तरावरील अधिकारी असतील तेव्हा त्या-त्या स्तवरावरील नियंत्रक अधिकारी त्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करतील,

या अनुषंगाने त्या प्रतिवेदन अधिका-यांचे निकटतम वरिष्ठ अधिकारी प्रतिवेदीत गोपनीय अहवाल पुनर्विलोकीत करतील व सदर पुनर्विलोकन अधिका-यांचे निकटतम वरिष्ठ अधिकारी स्विकृती अधिकारी असतील.

(४) मुख्य वनसंरक्षक दर्जाच्या स्तरावरील अधिका-यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करण्यासाठी सर्वसाधारणपणे प्रतिवेदन अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक राहतील. परंतू जेथे जेथे मुख्य वनसंरक्षकांचे निकटम नियंत्रण अधिकारी प्रधान मुख्य वनसंरक्षक स्तरावरील अधिकारी अील तेव्हा त्या स्तरावरील नियंत्रक अधिकारी त्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करतील या अनुषंगाने त्या प्रतिवेदन अधिका-यांचे निकटतम वरिष्ठ अधिकारी प्रतिवेदीत गोपनीय अहवाल पुनर्विलोकीत करतील व सदर पुनर्विलोकन अधिका-यांचे निकटतम वरिष्ठ अधिकारी स्विकृती अधिकारी असतील.

(५) महाराष्ट्र वन विकास महामंडळ ,मर्यादित आणि सामाजिक वनीकरण संचालनालयाच्या अधिपत्याखालील भा.व.से. अधिका-यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदित / पुनर्विलोकित व स्विकृत करण्यासाठी सुध्दा उपरोक्त सूचना लागू असून त्या-त्या स्तरावरील समकक्ष अधिकारी गोपनीय अहवालाबाबत वरीलप्रमाणेच कार्यवाही करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( राजेंद्र मंगरुळकर )
सह सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री (वने)/ मा. राज्यमंत्री (वने), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ मर्यादीत , नागपूर.
संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व अप्पर मुख्य वनसंरक्षक.
सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व वनसंरक्षक / सर्व उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी व सहायक वनसंरक्षक पदावर कार्यरत असलेले भारतीय वनसेवेतील अधिकारी
सर्व प्रादेशिक व्यवस्थापक/ सर्व विभागीय व्यवस्थापक, एफ.डी.सी.एम.लि.
सर्व सह संचालक सामाजिक वनीकरणवृत्त.
प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक.
सहसचिव/ उप सचिव /विशेष कार्य अधिकारी (फ-१), महसूल व वनविभाग (वनकक्षातील).
सर्व अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (वनकक्षातील).
निवडनस्ती, फ-७ कार्यासन, महसूल व वन विभाग